सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
GOVERNMENT COLLEGE OF ENGINEERING, JALGAON
(An Autonomous Institute of Government of Maharashtra)
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव
( महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था )
National Highway 53, Jalgaon-425002 | राष्ट्रीय महामार्ग ५३, जळगाव-४२५००२
Phone: (0257) 2281522,2280511,2280534 | फोन (०२५७) २२८१५२२,२२८०५११,२२८०५३४
Email: principal.gcoejalgaon@dtemaharashtra.gov.in Website: www.gcoej.ac.in

जा. क्र.: शाअमज/ है.प्रै. /२०२५/ ११ दिनांक: 2 JAN 2024

# परिपत्रक

निम्नस्वाक्षरीकार यांच्या असे निदर्शनास आले आहे की, संस्थेची नियमित अध्यापनाची वेळ संपल्यानंतरही रात्री उशिरापर्यंत संस्था परिसरात विदयार्थी व विदयार्थीनी एकत्र वावरतांना आढळुन आले आहेत. संबंधित विदयार्थ्यांच्या सुरक्षेच्या दष्टीने महाविद्यालयातील सर्व विदयार्थ्यांना सुचित करण्यात येते की, हे परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून महाविद्यालयाची रिडींग रुम ही खालीलप्रमाणे खुली करण्यात येईल.

| वेळ | रीडींग रुम मध्ये प्रवेश |
|---|---|
| सकाळी ७.०० ते रात्री ७.०० | सर्व विद्यार्थी व विद्यार्थीनी |
| रात्री ७.०० ते रात्री १२.०० | फक्त विद्यार्थी **(विद्यार्थीनीसाठी प्रवेश बंद )** |
| रात्री १२.०० ते सकाळी ७.०० | सर्वांसाठी प्रवेश बंद |

तसेच या परिपत्रकाद्वारे सुचित करण्यात येते की, संस्थेच्या बाहेरील परिसरात राहणा-या सर्व विद्यार्थीनींना रात्री ७.०० ते सकाळी ७.०० पर्यंत प्रवेश बंद राहील. अगदी अपवादात्मक परिस्थितीत परवानगीनेच प्रवेशाची मुभा राहील.

02/01/2024

( डॉ. सुहास सुधाकरराव गाजरे )
प्राचार्य
शासकिय अभियांत्रिकी महाविदयालय, जळगांव.

प्रत १. कुलमंत्री मुलांचे वसतीगृह - त्यांनी सदरचे परिपत्रक मुलांचे वसतीगृह सुरक्षा रक्षक यांच्या निदर्शनास आणावे व विद्यार्थी रिडींग रुम मध्येच होता, जेवणासाठी बाहेरील मेस मध्ये गेलेला होता किंवा कसे याची खात्री करुनच वसतीगृहात प्रवेश देण्यात यावा. त्याव्यतिरिक्त विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येवू नये अशा सुचना पहारेकरी यांना देण्यात याव्यात.

२. कुलमंत्री मुलींचे वसतीगृह - त्यांनी सदरचे परिपत्रक मुलींचे वसतीगृह सुरक्षा रक्षक यांच्या निदर्शनास आणावे व वसतीगृह प्रवेशित विद्यार्थीनींकरीता वसतीगृह परिसरात स्वतंत्र अशी रात्री ७ ते सकाळी ७ वाजेपर्यंत रिडींग रुमची पर्यायी व्यवस्था करावी. तसेच रात्री ७ नंतर आलेल्या विद्यार्थीनींची शहानिशा करुनच वसतीगृहात प्रवेश देण्यात यावा.

३. सुरक्षा पर्यवेक्षक - त्यांना सुचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेकरीता रात्री ७.०० ते सकाळी ७.०० वाजेपर्यंत संस्था परिसरात येणा-या विद्यार्थी, पालक, अनोळखी विद्यार्थी / व्यक्ती यांची पुर्णपणे शहानिशा करुन प्रवेश दयावा. व त्याबाबतची नोंद स्वतंत्र रजिस्टर मध्ये ठेवण्यात यावी. तसेच संस्था परिसरात रात्री ७:०० ते सकाळी ७:०० वाजेपर्यंत विदयार्थी / विदयार्थीनी यांचे ओळखपत्र तपासावे व बहिस्त विद्यार्थी/विद्यार्थीनी तसेच अनोळखी व्यक्ती यांना प्रवेश निर्बंध करावा.तसेच संस्थेच्या परिसरात (भटके कुत्रे अथवा सरपटणारे प्राणी यांचेपासून संरक्षणाच्या दृष्टीने) रात्री ७.०० वाजेनंतर विद्यार्थ्यांना रिडींग रुम व्यतिरिक्त इतरत्र बाहेर बसू / फिरु देवू नये असे विद्यार्थी आढळून आल्यास त्यांचे ओळखपत्र कार्यालयात जमा करण्यात यावे.

४. सुरक्षा रक्षक - त्यांना सुचित करण्यात येते की, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सायंकाळी त्यांचे शैक्षणिक कार्य संपल्यानंतर पाण्याच्या बाटल्या भरणे, स्वच्छता गृहास जाणेसाठी शैक्षणिक इमारत परिसरात प्रवेश देण्यात येऊ नये.